# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पुराडा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील प्राथमिक आरोग्य पथकाचे केंद्रात रूपांतर करण्याबाबत

**(१) ३०६ (१८-०३-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुराडा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील प्राथमिक आरोग्य पथकाचे केंद्रात रूपांतर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक १६ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य पथकाचे केंद्रात रूपांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०२-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे पुराडा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील प्राथमिक आरोग्य पथकाचे रुपांतर प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्यास दिनांक ०३/०९/२०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

# राज्यातील ट्रामा केअर युनिटची व्यवहार्यता तपासून धोरण निश्चित करण्याबाबत

**(२) ३०४९ (२९-०५-२०२०) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ३७० ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ट्रामा केअर युनिटची केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे व्यवहार्यता तपासून धोरण निश्चित करण्यासाठी शासनाने एक समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व त्या अहवालात नमूद केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, ट्रामा केअर युनिटबाबत शासनाकडून कोणते धोरण निश्चित करण्यात आले वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, सदर समितीने दिनांक १३ नोव्हेंबर, २०१९ ला आपला अहवाल शासनास सादर केला आहे. दिनांक १८ सप्टेंबर २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये ट्रामा केअर युनिटची (TCU) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे व्यवहार्यता तपासून धोरण निश्चित करण्यासंदर्भात गठीत केलेल्या तांत्रिक समितीच्या शिफारशी धरुन राज्यातील ट्रॉमा केअर युनिटबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

अ) नविन TCU हे Level ३ TCU असणे आवश्यक असून Level ३ TCU सुरू करण्यास मान्यता देताना ते जिल्हा रुग्णालय/सामान्य रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय(१०० बेड) या ठिकाणी मंजूर करण्यात यावेत तसेच त्यासाठी १०० ते २०० किलो मीटर अंतराची अट असावी.

ब) कार्यान्वित असलेल्या परंतु केवळ १०० ते २०० कि.मी अंतराची अट पूर्ण करणाऱ्या सर्व सध्याच्या ग्रामीण रुग्णालय/उप जिल्हा रुग्णालय (५० ते १०० खाटा) आणि जिल्हा रुग्णालयातील TCU चे Level ३ TCU मध्ये श्रेणीवर्धन करण्यात यावे.

क) समितीच्या शिफारशीनुसार Level ३ TCU च्या मनुष्यबळ, उपचार साधनसामग्री व सुविधांमध्ये दर्जा वाढ करण्यात यावी.

ड) निकषात न बसणाऱ्या सर्व TCU च्या मान्यता रद्द करण्यात याव्या तसेच ग्रामीण रुग्णालयाशी संलग्न असलेले १७ TCU बंद करण्यात येऊन त्यांचे रुपांतर ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात करण्यात यावे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील कांजुरमार्ग पश्चिम परिसरातील रुग्णास रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने रुग्णाचा मृत्यू झाल्याबाबत

**(३) ४१२१ (१७-०७-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर : दिनांक - रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक मधील प्रश्न क्रमांक ३२१८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांजुरमार्ग पश्चिम परिसरात राहणाऱ्या एका रुग्णाला श्वास घेण्यास त्रास होत असल्याकारणाने त्याच्या कुटुंबियांनी त्याला रुग्णालयात दाखल करण्यासाठी १०८ क्रमांकावर फोन करुन रुग्णवाहिकेस येण्यासाठी विनंती करुन रुग्णवाहिकेची ५ तास वाट पाहिल्यानंतर रुग्णवाहिका आली नसल्याकारणाने रुग्णाचा मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक ९ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०८ क्रमांकावर फोन केल्यानंतर रुग्णवाहिका पाठविण्यास उशिर होणार आहे किंवा कसे याबाबत रुग्णाच्या कुटंबियांना का कळविण्यात आले नाही,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेजबाबदार दोषींवर कारवाई करुन मुंबई शहरातील गरीब व गरजू रुग्णांना विनाविलंब रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२३-०७-२०२१) :** (१) आणि (२) नाही, हे खरे नाही.कांजूर मार्ग पश्चिम भागातून कोणताही कॉल आपत्कालीन संपर्क कक्ष (१०८) पुणे येथे प्राप्त झालेला नाही.
(३) आणि (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात केंद्र शासनाने दिलेल्या व्हेंटिलेटर्सचा वापर न झाल्याबाबत

**(४) ५६५९ (१७-११-२०२०) श्री.जयंत पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ज्येष्ठ पत्रकार संतोष पवार यांचा कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दिनांक ९ सप्टेंबर, २०२० रोजी ऑक्सिजन वेळेवर न मिळाल्याने मृत्यू झाल्यानंतर रायगड जिल्हा रुग्णालयाकडून पाठविण्यात आलेले चार व्हेंटिलेटर कार्यान्वित करण्यात न आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चारही व्हेंटिलेटर कार्यान्वित न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कोरोना रुग्णांवर उपचार करण्यासाठी केंद्र शासनाने राज्य शासनाला ४५०० व्हेंटिलेटर्सचा पुरवठा केला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केंद्र शासनाने दिलेल्या व्हेंटिलेटर्स व्यतिरिक्त शासनाने किती व्हेंटिलेटर्स खरेदी केली आहेत तसेच तज्ञ मनुष्यबळाअभावी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या व्हेंटिलेटर्सचा वापर होऊ शकला नसल्यामुळे राज्यात व्हेंटिलेटर्स अभावी किती रुग्णांचा मृत्यू झाला आहे,
(५) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टर तसेच अन्य कर्मचाऱ्यांचा अभाव असल्याकारणाने जिल्हा शल्यचिकित्सकांनी कर्जत उपजिल्हा रुग्णालयासह माणगाव, पेण, महाड, श्रीवर्धन व खालापूर येथील उपजिल्हा रूग्णालयांनासुध्दा व्हेंटिलेटर व आवश्यक तो कर्मचारी मिळावा म्हणून मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ह्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन कोरोनाचा प्रादुर्भाव विचारात घेता कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील चारही व्हेंटिलेटर विनाविलंब कार्यान्वित होण्याच्यादृष्टीने तसेच राज्यात विशेषत: रायगड जिल्ह्यातील अन्य ठिकाणच्या उपजिल्हा रुग्णालयात व्हेंटिलेटर व डॉक्टर तसेच अन्य कर्मचारी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०८-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

उपजिल्हा रुग्णालय, कर्जत येथे दिनांक २५/१०/२०२० पासून कोविड-१९ आयसीयु कक्षामध्ये ४ व्हेंटिलेटर्स कार्यान्वित करण्यात आले आहेत.

(३) हे खरे आहे.

केंद्र शासनाकडून राज्य शासनाला ४३८३ व्हेंटिलेटर्सचा पुरवठा झाला आहे.

(४) केंद्र शासनाने दिलेल्या व्हेंटिलेटर्स व्यतिरिक्त स्थानिक स्तरावर एकूण ३६८ व्हेंटिलेटर्स खरेदी करण्यात आले आहेत व संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना व्हेंटिलेटर्सचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

तसेच व्हेंटिलेटर अभावी कोणत्याही रुग्णाचा मृत्यू झालेला नाही.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मुकबधीर, मतिमंद शाळेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(५) ५९३७ (१४-१२-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुकबधीर, मतिमंद शाळेतील १८ वर्षांपासून कंत्राटी पध्दतीवर कार्यरत कर्मचाऱ्यांचा नियमित (स्थायी) करण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित

असल्याबाबत विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशन, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री श्री.बडोले यांच्या अध्यक्षतेखाली रविभवन, नागपूर येथे दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्र देवून अपंग आयुक्तांसह बैठक घेतली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कंत्राटी पध्दतीवर कार्यरत कर्मचाऱ्यांचा नियमित (स्थायी) करण्याबाबतच्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१७-०९-२०२१) :** (१) होय.
(२) दिव्यांग शाळेतील कंत्राटी पध्दतीवर कार्यरत कर्मचाऱ्यांना नियमित करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा कर्मचारी, संलग्न वसतिग़ह अधीक्षक/गृहपाल यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(६) ५९४३ (१४-१२-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा/कार्यशाळा, संबंधित कार्यरत वसतिगृह अधीक्षक/गृहपाल यांना १९९७ दिव्यांगांच्या शाळा संहितेनुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये ५२००-२०२०० व ग्रेड पे २८००/- मिळणे अपेक्षित होते, परंतु त्यांना ५२००-२०२०० व ग्रेड पे १९००/- वेतनश्रेणी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी संघटनेच्यावतीने व नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास अनेकवेळा निवेदने देवून अन्याय दूर करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेतनश्रेणीतील त्रुटींची पुर्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१७-०९-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) होय.

दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा/कार्यशाळा, संबंधित कार्यरत वसतिगृह अधीक्षक/गृहपाल यांना आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृह अधीक्षक यांच्याप्रमाणे वेतनश्रेणी देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुदानित दिव्यांग शाळेतील शिक्षकांना शारिरीक शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(७) ५९६९ (१४-१२-२०२०) श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागातील अनुदानित दिव्यांग शाळेत कार्यरत शिक्षकांना सामान्य शाळेत कार्यरत शारिरीक शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विषयावर सकारात्मक निर्णय होण्यासाठी नागपूर येथील लोकप्रतिनिधींनी सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सामान्य शाळेत कार्यरत शारिरीक शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबतच्या प्रस्तावासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१७-०९-२०२१) :** (१) होय.
(२) नाही.
(३) दिव्यांग शाळेतील कार्यरत शिक्षकांना, सामान्य शाळेतील कार्यरत शारिरीक शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात आला होता. सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने बक्षी समितीचा अहवाल प्रसिध्द न झाल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात रुग्णवाहिका, यंत्रसामुग्री, मनुष्यबळ, औषधे व इतर अनुषंगिक साधनांचा तुटवडा असल्याबाबत

**(८) ८४९९ (१०-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य घटनेप्रमाणे राज्य सूचीतील विषयांची जबाबदारी राज्य शासनाकडे असून सार्वजनिक आरोग्य हा विषय राज्य सूचीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी मागील एक वर्षात किती खर्च केला व त्यामधून कोणती कामे केली आहेत,

(३) असल्यास, आजही रुग्णवाहिका, यंत्रसामुग्री, मनुष्यबळ, औषधे व इतर अनुषंगिक साधनांचा तुटवडा जाणवण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्य शासनाला सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये सुधारीत अंदाज (RE) नुसार रुपये १३४९१२७.३४ लक्ष इतके अनुदान मंजूर झाले होते. त्यापैकी अंतिम सुधारीत तरतूद (FMG) नुसार रुपये ११८९५५३.१२ लक्ष इतका खर्च झालेला आहे.या अनुदानातून रुग्णवाहिका, नवनिर्मित आरोग्य संस्थाकरीता यंत्रसामुग्री, राज्यातील आरोग्य संस्थांकरीता औषधे, तदअनुष्गिक बाबी, कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते इ. बाबींकरीता खर्च करण्यात आलेला आहे.

(३) व (४) रुग्णवाहिका, यंत्रसामुग्री, औषधे व इतर अनुषंगिक साधने आवश्यकतेनुसार उपलब्ध आहेत. काही तज्ञ अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने गट अ व गट ब संवर्गातील रिक्तपदे पदोन्नतीने व सरळसेवेने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड मधील रिक्त पदे

भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तथापि, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आवश्यकतेनुसार कंत्राटी पदे स्थानिकस्तरावर भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डागा रूग्णालयातील कंत्राटी सफाई कामगारांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबत

**(९) ८५८२ (२२-०६-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील डागा स्मृति शासकीय स्त्री रूग्णालयात कंत्राटी कामगारांवर उपासमारीची वेळ आल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चैतन्य सिक्युरीटीज या कंपनीच्या माध्यमातुन डागा रूग्णालयात ४२ कंत्राटी कर्मचारी सफाईचे काम करत असून कंपनीचे कंत्राट संपुष्टात आल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांचे काम बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने डागा रूग्णालयातील कंत्राटी सफाई कामगारांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-०८-२०२१) :** (१) आणि (२) नाही, हे खरे नाही.
(३) आणि (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय आस्थापनामध्ये जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचेच सुरक्षा रक्षक कामावर ठेवण्याबाबत

**(१०) ८६३५ (१०-०६-२०२१) श्री.अंबादास दानवे : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४८९३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय आस्थापनांमध्ये शासन निर्णयानुसार जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचेच सुरक्षा रक्षक घेणे अनिवार्य आहे असा अध्यादेश असतानाही शासकीय आस्थापनांमध्ये खाजगी एजन्सीचे सुरक्षा रक्षक ठेवण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील काही शासकीय कार्यालयांच्या प्रमुखांकडून मंडळाच्या सुरक्षा रक्षकांना काढून शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन खाजगी एजन्सीचे सुरक्षा रक्षक कामावर ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद शहरातील मध्यवर्ती बसस्थानक, सिडको बसस्थानक, तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात खाजगी सुरक्षा रक्षक नेमले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शासकीय आस्थापनामध्ये जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचेच सुरक्षा रक्षक कामावर ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही. माजी सैनिकांची मान्यताप्राप्त एजन्सी मेस्को यांचे मंडळाच्या सुरक्षा रक्षकांसह सुरक्षा रक्षक नेमलेले आहेत.

(४) ज्या सरकारी आस्थापनांनी सुरक्षा रक्षक मंडळाच्या सुरक्षा रक्षकांऐवजी खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीचे सुरक्षा रक्षक नेमलेले आहेत अशांविरुध्द रितसर कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गरीब रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून वगळण्यात आलेल्या आजारांवर उपचार करण्याबाबत

**(११) ८६७५ (१८-०६-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाबाधित रुग्णांवर महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचार करण्याचा शासनाने निर्णय घेऊन मोठा दिलासा दिला असला तरी सदर योजना प्रवर्तकांनी या योजनेंतर्गत येणारे १२० उपचार पध्दती दिनांक १ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय रुग्णालय हे कोविड उपचार केंद्र बनल्यामुळे इतर रुग्णांना तेथे उपचार मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गरीब रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून वगळण्यात आलेल्या १२० आजारांवर उपचार करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०९-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

कोविड-१९ साथरोग उद्रेकाच्या पार्श्वभुमीवर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत शासकीय रुग्णालयांसाठी राखीव असलेले १२० उपचार दिनांक २३ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये अंगीकृत खाजगी रुग्णालयांना उपलब्ध करून देण्यात आले होते. त्याची मुदत ३१ मार्च, २०२१

रोजी संपुष्टात आलेली आहे. सदर १२० उपचार ०१ एप्रिल, २०२१ पासून फक्त शासकीय रुग्णालयांत नियमीतपणे सुरू आहेत. तसेच राखीव उपचारापैकी ३ उपचार म्युकरमायकोसीससाठी अंगीकृत खाजगी रुग्णालयात उपलब्ध करून दिले आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई येथील एपीएमसी मार्केटमध्ये बाजार समितीने बांधलेल्या निर्यात भवन आणि बहुउद्देशीय इमारतीच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१२) ८७०३ (१३-०७-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील एपीएमसी मार्केटमध्ये बाजार समितीने बांधलेल्या निर्यात भवन आणि बहुउद्देशीय इमारतीच्या कामात संबंधित अधिकारी व कंत्राटदारांनी गैरव्यवहार करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार समितीने सेक्टर १९ मधील भूखंड क्रमांक ३ वर निर्यात भवन उभारले असून मे.टॉस्कानो इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, ठाणे या कंत्राटदाराला प्रथम पंधरा महिन्याच्या मुदतीत काम पूर्ण करण्याच्या अटीवर दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास निर्यात भवन उभारण्याचे कार्यादेश देण्यात आले, त्यानुसार हे काम दिनांक २० मार्च, २०१४ रोजी वा त्यासुमारापर्यंत पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना देखील उक्त काम पूर्ण होऊ शकले नसल्यामुळे काम पूर्ण करण्यासाठी बाजार समितीने संबंधित कंत्राटदारांना दोन वेळा मुदतवाढ ही दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कालावधीत बाजार समितीने कंत्राटदारांना मूळ रकमेच्या तुलनेत एक कोटी ४३ लाख ८९ हजार ५३६ रुपये जादा दिल्याचा ठपका वैज्ञानिक लेखापरीक्षण अहवालात नोंदविले आहे, कामाला मुदतवाढ देताना कंत्राटदारावर दंड आकारण्याऐवजी बाजार समितीने त्याला मुदतवाढीसह दरवाढीच्या फरकाची ही रक्कम अदा केली असून, विशेष म्हणजे निर्यात भवन येथे मांडलेल्या एकूण १२ गाळयांसाठी खरेदीदार आणि मागणीचा विचार करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परस्पर निर्यात भवन बांधून बाजार समितीने शासनाच्या कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी केल्याची बाब वैज्ञानिक लेखापरीक्षणान्वये निदर्शनास आली असून आवश्यकता नसताना सदर दोन्ही इमारती बांधल्याने सदर इमारती विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने गैरव्यवहार व कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराबाबत संबंधित अधिकारी व कंत्राटदाराचे विरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (१५-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) भूखंड क्रमांक ३ वर निर्यात भवन उभारणीकरीता निविदेमध्ये निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत काम पुर्ण न झाल्याने विहित पध्दतीचा वापर करून मुदतवाढ देण्यात आलेली होती.
(३) कंत्राटीतील तरतुदीनूसार नियमाप्रमाणे वाढीव रक्कम देण्यात आली आहे. निर्यात भवनाचे बांधकाम निर्यातीस चालना देणेसाठी म्हणजे पायाभूत सुविधा उभारण्याचे दृष्टीने उचित कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) नाही.
निर्यात भवनाचा वापर सुरू आहे. फळ बाजारातील बहुउद्देशीय इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात कोळसा हाताळणी विभागातील कन्व्हेअरबेल्टला भीषण आग लागल्याबाबत

**(१३) ८७७८ (१३-०७-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दूर्गापूर (जि.चंद्रपूर) येथील महाऔष्णिक वीज केंद्राच्या ८ व ९ क्रमाकांच्या कोळसा हाताळणी विभागातील कोळसा वाहून नेणाऱ्या बेल्ट कन्व्हेअरला अचानक भीषण आग लागल्याची घटना दिनांक ३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आगीत झालेल्या नुकसानीबाबत तसेच संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१६-०९-२०२१) :** (१) व (२) मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार, महानिर्मिती यांनी सदरील बाबतीत चौकशी केलेली आहे. सदर चौकशीत कन्व्हेअर बेल्ट क्र.१०४ अ / ब आणि मेकॅनिकल स्ट्रक्चर मधील घर्षणामुळे आकस्मिकरीत्या आग लागली होती असे त्यांनी नमूद केले आहे.

सदर घटनेसंदर्भात तत्कालीन उपमुख्य अग्निशमन अधिकारी ज्यांची आगीसंदर्भात संचलन व सुव्यवस्थेची जबाबदारी असते त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. परंतु, दरम्यानच्या काळात त्यांचा कोविड-१९ मुळे दुर्दैवी मृत्यू झाला.

कोळसा हाताळणी विभाग-ड येथील शिफ्ट प्रभारी, (कनिष्ठ अभियंता) व अतिरिक्त कार्यकारी अभियंता (संचलन) ज्यांच्याकडे कोळसा हाताळणी विभागातील कन्वेअर बेल्टच्या संचलन व संपूर्ण देखभालीची जबाबदारी असते, त्यांना मुख्य अभियंता (संवसु), चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राने कारणे दाखवा नोटीस बजावली होती व त्यांच्यावर चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राकडून शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

मे.कुणाल एंटरप्रायझेस नागपूर यांना कन्वेअर बेल्टच्या संपूर्ण देखभालीचे काम देण्यात आले आहे. त्यांनाही मुख्य अभियंता (कोळसा हाताळणी विभाग), चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र यांचेकडून कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील विविध विकास कामांकरीता सन २०२१-२२ या वर्षाकरीता मंजूर निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१४) ८७९३ (१७-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्याच्या विविध विकास कामाकरीता जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सन २०२१-२२ या वर्षात रुपये २०० कोटीचा निधी मंजूर करण्यात आला असून आतापर्यंत केवळ रुपये २० कोटी प्राप्त झाले असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरीत निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२८-०९-२०२१) :** (१), (२) व (३) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ अंतर्गत वर्धा जिल्ह्याकरीता रुपये २०० कोटी इतका नियतव्यय अंतिमत: मंजूर करण्यात आला आहे. नियोजन विभागाच्या दिनांक १९/०४/२०२१ व दिनांक ०५/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये एकूण रुपये ९५.८३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

---

## राज्यातील कोरोना संसर्गातून बरे झालेल्या रुग्णांना आरोग्य विमा आणि टर्म इन्शुरन्स मिळण्याबाबत

**(१५) ८८५६ (१०-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संसर्गातून बऱ्या झालेल्या रुग्णांना आरोग्य विमा आणि टर्म इन्शुरन्स जारी करण्यासाठी विमा कंपन्या तीन ते सहा महिन्यांची प्रतिक्षा करायला लावत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमा कंपन्यांकडून “कूलिंग ऑफ पिरियड” जारी करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील लाखो नागरिकांना आरोग्य विमा आणि टर्म इन्शुरन्स मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०९-०९-२०२१) :** (१), (२) व (३) रुग्णांना आरोग्य विमा आणि टर्म इन्शुरन्स जारी करणाऱ्या विमा कंपन्या ह्या IRDA (Insurance Regulatory and Development Authority) संस्थेच्या अखत्यारीत येतात. IRDA (Insurance Regulatory and Development Authority) ही संस्था केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन प्रलंबित असल्याबाबत

**(१६) ८८७५ (१७-०६-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे ऑगस्ट ते फेब्रुवारी, २०२१ दरम्यान विशेषत: कोकण विभागातील ६२६१ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका लेखा व कोषागार कार्यालय, मुंबई येथे पडताळणीसाठी प्रलंबित असल्याची बाब माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सेवापुस्तिकांची अंतिम पडताळणी न झाल्यामुळे त्यांना निवृत्तीवेतन (पेन्शन) मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवृत्तीवेतन मिळण्याच्या प्रकियेत वेळ जाऊ नये यासाठी ही पुस्तिका निवृतीच्या सहा महिने अगोदर लेखा व कोषागार कार्यालयात पाठविली जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकांच्या पडताळणीसाठी पुरेशा प्रमाणात कर्मचारी उपलब्ध करून वेळेत सेवा पुस्तिका पूर्ण करुन त्यांना निवृत्तीवेतन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२३-०८-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. मार्च,२०२१ अखेर प्रलंबित सेवापुस्तकांची संख्या ३८३३ आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) सद्य:स्थितीत निवृत्तपूर्व दोन महिने अगोदर सेवापुस्तके पडताळणीसाठी स्वीकारण्यात येत आहेत.
(४) सेवापुस्तकांच्या पडताळणीसाठी अतिरिक्त कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रुग्णांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(१७) ८९२९ (१७-०६-२०२१) श्री.प्रशांत परिचारक, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व खाजगी रुग्णालयातील ८० टक्के बेड रुग्णांकरीता आरक्षित असून गरीब घटकातील रुग्णांच्या देयकासाठी कोणतीही आर्थिक तरतूद केली नसल्याची बाब निदर्शनास आली असून प्रधानमंत्री व महात्मा फुले जन आरोग्य योजना ह्या एकत्रितपणे चालविण्यात येत असल्याने सर्वच आर्थिक उत्पन्न गटातील नागरिकांना याचा लाभ देण्याचा निर्णय गत वर्षी शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी रुग्णालयांकडून महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेची अंमलबजावणी होत नसल्याच्या ३४५१ पैकी २२२३ तक्रारींचे निराकरण झाले असून १२२८ तक्रारी दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निराकरणाच्या प्रक्रियेमध्ये होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत १ लाख २२ हजार रुग्णांना लाभ देण्यात आल्याचे राज्य शासनातर्फे जाहीर करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहिती अधिकारात प्राप्त माहितीनुसार ९ हजार ११८ रुग्णांना त्याचा लाभ मिळणार असल्याची माहिती माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ कोरोनाबाधितांना देतांना कडक निकष लावल्याने सोलापूर जिल्ह्यातील एकूण ६०४८३ रुग्णांपैकी ३८७६ रुग्णांना तसेच अहमदनगर जिल्ह्यातील १८५००० रुग्णांपैकी ४५०० रुग्णांना या योजनेचा लाभ मिळाला आहे, खाजगी रुग्णालयात रुग्णांना किती सुट देण्यात येते याची माहिती नसल्याने उर्वरित रुग्णांना स्वखर्चाने उपचार करून घ्यावे लागल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात ८५ टक्के नागरिकांचा या योजनेत समावेश असताना केवळ ९ हजार ११८ रुग्णांना या योजनेचा लाभ मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभापासून वंचित असलेल्या व राहणाऱ्या रुग्णांना सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासन निकषामध्ये बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील जास्तीत जास्त रुग्णांना या योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत तसेच सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०९-०९-२०२१) :** (१) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना ह्या एकत्रितपणे राबविण्यात येत असून सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक २३ मे, २०२० अन्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना ही सर्व नागरिकांना खुली करण्यात आली आहे.

(२) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत दिनांक १ एप्रिल, २०२० ते दिनांक १५ जून, २०२१ पर्यंत खाजगी रुग्णालयाविरुध्द एकूण ६११५ तक्रारींची नोंद झालेली आहे. त्यापैकी ३९२५ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून २१९० तक्रारी निराकरणाच्या प्रक्रियेमध्ये आहेत.

(३) एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक २० जून, २०२१ पर्यंत एकूण ८,४१,८१२ उपचार व शस्त्रक्रिया झाल्या आहेत.

(४) माहे एप्रिल, २०२० ते माहे मे, २०२१ या कालावधीत ७,९०,२०२ कोविड रुग्णांवर योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णांलयामध्ये मोफत उपचार झाले आहेत.

सोलापूर जिल्हयातील अंगीकृत रुग्णालयांमध्ये ११०७५ कोविड रुग्णांवर मोफत उपचार झाले असून अहमदनगर जिल्हयातील अंगीकृत रुग्णालयांमध्ये ९६२७ कोविड रुग्णांवर मोफत उपचार झाले आहेत.

(५) एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक २० जून, २०२१ पर्यंत एकूण ८,४१,८१२ उपचार व शस्त्रक्रिया झाल्या आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक २३ मे, २०२० अन्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सर्व नागरिकांना खुली करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील सर्व पात्र शिधापत्रिका धारक व शिधापत्रिका धारक नसलेले नागरिकसुद्धा योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील ताडी उद्योग शासनाच्या परवाना वितरणाच्या जाचक अटीमुळे बंद असल्याबाबत

**(१८) ८९७० (१०-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील भुमीपुत्रांना आर्थिक उत्पन्न मिळवून देणारा ताडी उद्योग शासनाच्या परवाना वितरणाच्या जाचक अटीमुळे बंद होत असल्याने डहाणू, बोर्डी, चिंचणी व झाई या किनारपट्टीलगतच्या शहरातील अनेक ताडीची दुकाने बंद पडली असून या व्यवसायावर अवलंबून असलेल्या ताडी व्यवसायिक कुटुंबावर उपासमारीचे संकट आल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ताडी उद्योगाच्या जाचक अट शिथिल करण्याबाबतची मागणी ताडी व्यवसायिकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२८-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सन २०१८-१९ च्या ताडी अनुज्ञप्ती लिलावात डहाणू तालूक्यातील एकूण ७५ घोषित ताडी दुकानांपैकी ३१ ताडी दुकाने देण्यात आली होती. सन २०१९-२० व २०२०-२१ या ताडी वर्षी सन २०१८-१९ या ताडी वर्षात कार्यरत असलेल्या ताडी अनुज्ञप्त्यांना शासनामार्फत मुदतवाढ व नुतनीकरण करण्यात आले. सन २०१८-१९ या वर्षी कार्यरत ३१ ताडी दुकानांपैकी सन २०२०-२१ मध्ये १४ ताडी अनुज्ञप्तीधारकांनी अनुज्ञप्ती शुल्काचा भरणा केला आहे.

तथापि, ज्या अटी सन २०१८-१९ च्या ताडी अनुज्ञप्ती वितरण धोरणामध्ये होत्या त्याच पुढील दोन वर्षे कायम आहेत.
(२) व (३) ताडी विक्री संघटनाकडून ताडी उद्योगास चालना मिळण्याच्या अनुषंगाने काही मागण्या शासनास प्राप्त झाल्या आहेत. ताडी विक्री संघटनांच्या मागण्यांच्या अनुषंगाने, कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शासन निर्णय दिनांक २४/१२/२०२० अन्वये, सन २०२०-२०२१ या ताडी वर्षाकरीता अनुज्ञप्ती शुल्कात मागील वर्षाच्या तुलनेत करण्यात आलेली ६% वाढ मागे घेण्यात आली आहे.

तसेच, सन २०२०-२१ या ताडी वर्षातील दिनांक ०१/०९/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ या कालावधीसाठी, मागील वर्षीच्या म्हणजेच सन २०१९-२० या ताडी वर्षातील अनुज्ञप्ती शुल्काच्या प्रमाणात केवळ ३ महिन्यांचे अनुज्ञप्ती शुल्क आकारण्यात आले आहे. यादवारे, लॉकडाऊन कालावधीत संबंधित ताडी विक्री अनुज्ञप्तीधारकांना दिलासा देण्याचा प्रयत्न शासनामार्फत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील डागा रूग्णालयातील शिशु केअर युनिटमध्ये अद्ययावत अग्निमशन व्यवस्था नसल्याबाबत

**(१९) ९०६९ (१८-०६-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील डागा रूग्णालयातील शिशु केअर युनिटमध्ये अग्निमशन व्यवस्था नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डागा रूग्णालयात पहिल्या मजल्यावर फायर एक्झीटचे बोर्ड लावले असून आग लागली तर विझविण्याकरीता कोणतीही अद्ययावत यंत्रणा कार्यरत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भंडारा येथे घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती होवू नये याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-०८-२०२१) :** (१) आणि (२) हे अंशत: खरे आहे.
रुग्णालयातील SNCU विभागात व संपूर्ण रुग्णालयात अग्नि प्रतिबंधक उपाययोजना म्हणून रुग्णालयातील सर्व विभागात Fire Extinguisher प्रस्थापित करण्यात आलेले आहेत. रुग्णालयात SNCU विभाग बाह्यरुग्ण विभाग इमारती(G+३) मध्ये पहिल्या माळ्यावर स्थित आहे, रुग्णालयात आग प्रतिबंधक उपाययोजना अंतर्गत Fire Safety Norms नुसार विहित ठिकाणी Fire Exit चे बोर्ड तसेच Fire Extinguisher लावण्यात आलेले आहेत. अग्निशमन विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेतर्फे रुग्णालयातील प्रत्येक इमारतीचे Fire Audit करण्यात आले असून सदर विभागातर्फे Fire Audit अहवाल प्राप्त झाला आहे. अहवालातील सुचनांच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग (स्थापत्य व विद्युत) यांचे कडून अग्नि प्रतिबंधक उपाययोजना प्रस्थापित करणे संबंधाने रुपये १,६५,५३,८८७/- एवढ्या रकमेचे अंदाजपत्रके कार्यालयास प्राप्त झालेली असून डागा स्मृती रुग्णालय, नागपूर यांनी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धता करीता जिल्हा नियोजन अधिकारी, नागपूर यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे.
(३) आणि (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सहकार विभागातील सहाय्यक निबंधकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२०) ९२२८ (१३-०७-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सहकार विभागातील सहाय्यक निबंधकांची २७५ पदे मंजूर असून त्यापैकी १०८ पदे रिक्त आहेत, तर बदल्यांच्या माध्यमातून अजून ८६ पदे रिक्त होणार आहेत, अशी एकूण १९४ पदे रिक्त होणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकार आयुक्तांनी सहकार अधिकारी श्रेणी १ च्या राज्यातील ११३ अधिकाऱ्यांना पद्दोन्नती देवून सहाय्यक निबंधक या पदावर नियुक्त करावे, असा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ११३ सहकार अधिकाऱ्यांना पदोन्नती देवून सहाय्यक निबंधक म्हणून नियुक्ती देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१७-०९-२०२१) :** (१), (२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय दिनांक ०५/०५/२०११ चे आकृतीबंधानुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,गट-ब संवर्गासाठी ४५० पदे असून व दिनांक ०१/०८/२०१६ च्या शासन निर्णयान्वये नवनिर्मित पालघर जिल्ह्यासाठी ०१ अशी एकूण ४५१ पदे सदरील संवर्गासाठी मंजूर करण्यात आली आहेत.

सेवाप्रवेश नियमानुसार भरतीचे प्रमाण सरळसेवा व पदोन्नतीसाठी ५०:५० असे आहे. त्यानुसार सरळसेवा कोटयात २२५ तर पदोन्नती कोटयात २२६ पदे येतात.

सरळसेवा कोटयात मंजूर असलेल्या २२५ पदांपैकी १८९ पदे/ बिंदू भरण्यात आली असून राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२० साठी १९ पदांची जाहिरात प्रसिध्द झाली आहे. तसेच,सदरील १९ पदांसाठी दिनांक २१/०३/२०२१ रोजी पुर्व परीक्षा घेण्यात आली आहे. याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सुरु आहे.

तसेच सरळसेवा कोटयात रिक्त असलेल्या १७ पदांपैकी वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०१५ नुसार सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गट-ब या करीता सन २०२१ साठी ११ पदांचे मागणीपत्र सादर करण्यात येत आहे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, गट-ब संवर्गात सरळसेवेची ०६ पदे / बिंदू रिक्त आहेत.

पदोन्नती कोटयात मंजूर असलेल्या २२६ पदांपैकी १९४ पदे / बिंदू भरली असून, ३२ पदे / बिंदू रिक्त आहेत. सदर पदे व बिंदूनामावलीनुसार दिनांक ३१/०८/२०२१ अखेर संभाव्य रिक्तता (१४) विचारात घेता ३२ + १४ अशी एकूण ४६ पदे सहकार अधिकरी श्रेणी-१ (वर्ग-३) मधून सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गट-ब (वर्ग-२) या पदावर पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ई कचऱ्याचा पुनर्वापर करण्यासाठी प्रोत्साहन धोरण आखण्याबात

**(२१) ९३७९ (२०-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्वाधिक “ई” कचरा महाराष्ट्रात निघत असून त्यातील ९० टक्क्याहून अधिक कचरा असंघटित क्षेत्राकडून हाताळला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू “ई” कचऱ्याचे पुनर्वापर आणि जबाबदारी घेण्यासाठी प्रोत्साहन देणारे धोरण आखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२०-०९-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) औद्योगिक आस्थापनांमध्ये निर्माण होणाऱ्या ई-कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्रामध्ये अर्टी व शर्ती देण्यात येतात.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सर्व महानगरपालिकांना ई-कचरा (व्यवस्थापन)नियम २०१६ अंतर्गत तरतुदींचे पालन करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून विविध माध्यमाद्‌वारे जसे वर्तमान पत्र, इलेक्ट्रिसिटी बिल्स, रेडिओ इत्यादीद्‌वारे जन जागृती करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृत्रिम सांधा रोपणाची शस्त्रक्रिया करण्यास खाजगी रुग्णालयास परवानगी देण्याबाबत

**(२२) ९४०५ (१५-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य अभियानांतर्गत प्रत्येक तालुकास्तरावर गरीब रुग्णांना उपचार मिळावा यासाठी खाजगी रुग्णालयाच्या नोंदीचे लक्षांक वाढवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे राज्यामध्ये किती रुग्णालये तालुकास्तरावर नोंदणीकृत झाले आहेत,

(३) असल्यास, कृत्रिम सांधा रोपणाची शस्त्रक्रिया केवळ शासकीय रुग्णालयात करण्याची मुभा देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शासकीय दवाखान्यात सांधा रोपणाचे शस्त्रक्रियागार (ऑपरेशन थेटर) सुसज्ज नसेल तर तेथे खाजगी रुग्णालयास परवानगी देण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२०-०८-२०२१) :** (१) हे खरे आहे.

दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक तालुक्यात किमान २ रुग्णालये अंगीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्यात १००० पर्यंत रुग्णालये अंगीकृत करण्याची मुभा आहे. आज रोजी ३५८ तालुक्यापैकी २५३ तालुक्यात रुग्णालय अंगीकृत करण्यात आली आहेत.

(२) आज रोजी राज्यामध्ये ९८८ रुग्णालये तालुकास्तरावर नोंदणीकृत झाले आहेत.

(३) हे खरे आहे.

सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया शासकीय व नगरपालिका, महानगरपालिका रुग्णालयासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच एमसीआय मान्यता प्राप्त पीजी पदवी अभ्यासक्रम असलेल्या खाजगी वैद्यकीय महाविद्यालये यांचेसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

(४) Laminar flow व इतर बाबींची पूर्तता केल्यावर शासकीय व नगरपालिका तसेच महानगरपालिका रुग्णालयाना सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याची परवानगी देण्यात येते.
दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ ते दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत १९३ सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाल्या असून दिनांक १ एप्रिल, २०२० पासून आजतागायत ४३६ सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिकेने शहरातील अनेक भागात सांडपाणी सर्व्हिस लाईन न टाकल्यामुळे रोगराई पसरल्याबाबत

**(२३) ९५५१ (११-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिकेमार्फत शहरातील सांडपाणी व गटारे साफसफाई व दुरुस्तीची कामे दरवर्षी करण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या बहुतांश भागात सांडपाणी सर्व्हिस लाईन टाकण्यात आली नसल्यामुळे सांडपाणी साचून त्यावर डासांचा प्रादुर्भाव वाढून रोगराई पसरल्याने नागरिकांमध्ये वाद व तंटे वाढत असल्याचे दिनांक १७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने उक्त ठिकाणी सांडपाणी सर्व्हिस लाईन टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१) अकोला महानगरपालिकेमार्फत शहरातील सांडपाणी व गटारे साफसफाई नियमितपणे व गटारे दुरुस्तीची कामे आवश्यकतेनुसार करण्यात येत आहेत.

(२), (३) व (४) अकोला मनपात सन २०१६ मध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या हद्दवाढ भागात, अनेक ठिकाणी पक्क्या स्वरुपाच्या नाल्या नसल्यामुळे कांही ठिकाणी सांडपाणी साचते, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, असे सांडपाणी साचू नये यासाठी महापालिकेकडून नियमितपणे उचीत कार्यवाही केली जात असून, याव्यतिरिक्त ज्या ठिकाणी सांडपाणी साठून राहते, अशा ठिकाणी महापालिकेच्या वतीने डास अळी नाशक रसायनांची फवारणी नियमितपणे केली जाते.

या हद्दवाढ भागात सांडपाणी साठून, डासांचा प्रादुर्भाव वाढल्याचे व रोगराई पसरल्याचे अथवा नागरिकांमध्ये वाद व तंटे वाढत असल्याबाबतची कोणतीही घटना, दिनांक १७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आलेली नाही.

या नवीन भागाचा महापालिकेच्या हद्दीत समावेश करण्यापूर्वीच या भागात विकास कामांचा मोठ्या प्रमाणात अनुशेष असल्याने, या भागात विविध विकास कामे करण्याकरीता शासनाने दिलेल्या निधीतून, प्रथम टप्प्यात या भागात रुपये ३३.२२ कोटींची विकास कामे करण्यात आलेली आहेत. या ठिकाणच्या कामासाठी जसजसा निधी उपलब्ध होईल तसतसे या भागात विकास कामे करण्याचे प्रस्तावित असल्याचे, अकोला महानगरपालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

## अकोला महानगरपालिकेच्या शाळांमधील मुख्याध्यापकांवर चुकीच्या पध्दतीने केलेली कारवाई मागे घेण्याबाबत

**(२४) ९५५८ (१८-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेमार्फत मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी गतवर्षी राबविण्यात आलेल्या सायकल खरेदी योजनेच्या अटी व निकषांनुसार ज्या विद्यार्थ्यांनी स्वखर्चाने सायकली खरेदी केल्या आहेत त्यांनी सायकल खरेदी देयक (जीएसटीसह) पालक विद्यार्थ्यांचा सायकलीसह फोटो शाळा मुख्याध्यापकांना देणे बंधनकारक होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सायकल खरेदी प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराबाबत महानगरपालिकेने ज्या २८ मुख्याध्यापकांवर कारवाई केली त्यामध्ये ज्या शाळेमधील पालकांनी स्वखर्चाने सायकली खरेदी करुन देयके सादर केली त्या ७ शाळांमधील मुख्याध्यापकांवर त्यांची चूक नसतानाही दोन वर्षांपर्यंत वेतनवाढ रोखण्याची कारवाई करण्यात आल्याचे दिनांक १७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मुख्याध्यापकांवर मनपाने केलेली कारवाई मागे घेण्याबाबत संबंधित मुख्याध्यापकांनी महानगरपालिका स्थायी समितीच्या मा.सभापतींकडे लेखी निवेदन सादर केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अकोला महानगरपालिकेने सदर निवेदनासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) नियोजन विभागाच्या दिनांक ०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार "विविध कल्याणकारी योजनांमध्ये" लाभार्थ्यांना लाभ देण्याकरीता अनुसरावयाची कार्यपध्दत निश्चित करण्यात आलेली आहे.

त्यानुसार लाभार्थ्याने सायकल खरेदी केल्यानंतर, त्याने खरेदी पावती सादर करावी व त्याची शहानिशा झाल्यानंतर, लाभार्थ्याच्या खात्यात अनुदानाची रक्कम करणे अपेक्षीत आहे.

तथापि, अकोला महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्याने, सद्य:स्थितीत उपरोक्त योजनेची अंमलबजावणी करणे संयुक्तीक नसल्याबाबत स्थायी समिती अकोलाने दिनांक २८/०७/२०२० रोजी ठराव पारित केलेला आहे. त्यामुळे मनपाकडून अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

योजनेची अंमलबजावणी करावयाची नाही, असा निर्णय झालेला असताना, वरिष्ठांचे कोणतेही निर्देश नसताना, पालकांनी खरेदी केलेल्या सायकलींची देयके, महापालिकेकडे सादर केल्याच्या प्रकरणात, सभापती,

स्थायी समिती, अकोला महानगरपालिका यांनी दिलेल्या निदेशानुसार, चौकशी करण्यात आलेली असून, यामध्ये २८ (७ मुख्याध्यापकासह) मुख्याध्यापक दोषी आढळून आल्याने, त्याच्या दोन वेतनवाढी दोन वर्षापर्यंत रोखण्याची कार्यवाही दिनांक ०१/०२/२०२१ च्या आदेशान्वये करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई रद्द करण्याबाबत सभापती, स्थायी समिती, अकोला मनपा यांचेकडे संबंधित मुख्याध्यापकांनी दिनांक ३१/०३/२०२१ व दिनांक ०२/०६/२०२१ रोजी निवेदने सादर केली आहेत. सदर निवेदने स्थायी समिती कार्यालयाकडे कार्यवाहीसाठी प्रलंबित असल्याचे, अकोला महानगरपालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

"तथापि, यासंदर्भात, अकोला मनपाच्या मुख्याध्यापकांकडून शासनाकडे निवेदन प्राप्त झाले असून, या निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, अकोला मनपा यांचेकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आलेला आहे."

---

## राज्यातील आदिवासींची रिक्त असलेली पदे भरण्यासंदर्भात बिरसा क्रांती दल संघटनेने केलेल्या मागणीबाबत

**(२५) ९५७८ (१७-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ७१९४ ला दिनांक १० मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशान्वये राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय निर्गमित करून बिगर आदिवासी उमेदवारांनी बळकावलेल्या आदिवासीकरीता राखीव असलेल्या जागा रिक्त करून त्या रिक्त होणाऱ्या जागेवर अनुसूचित जमाती प्रवर्गाची पदे सेवा प्रवेश नियमानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून अनुसूचित जमातीच्या वैध जात प्रमाणपत्रधारक उमेदवारांमधून भरण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून सदर पदे भरण्याची कार्यवाही करण्याचे राज्यातील प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना आदेशित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विशेष पद भरती कार्यक्रमाची मुदत संपली असूनही अद्यापी १२५०० रिक्त पदे भरली गेली नसल्याने राज्यभरात खोटया जात प्रमाणपत्राच्या आधारे अनुसूचित जमातींची बिगर आदिवासींनी बळकावलेली पदे रिक्त करुन त्या वैध उमेदवारांमार्फत पुन्हा भरण्याकरीता विशेष भरती मोहिम राबविण्याची मागणी बिरसा क्रांतीदल संघटनेने मा.मुख्यमंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री, मुख्य सचिव आदिकडे जव्हारचे तहसिलदार श्री.संतोष शिंदे यांच्यामार्फत फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त अनुसूचित जमातीच्या राखीव जागा वैध उमेदवारांमार्फत तात्काळ भरण्यासाठी जी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येतात, त्या पदाच्या जाहिराती काढून भरण्यात यावा आणि जी पदे आयोगाच्या कक्षेबाहेर येतात, ती रिक्त पदे सरळ सेवेने भरण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून कार्यवाही सुरू करण्याची मागणी सदरहू निवेदनाद्वारे करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२८-०६-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत रुजू झालेल्या व सदर जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतचे तसेच सदर अनुसूचित जमातीची रिक्त झालेली पदे कालबध्द कार्यक्रम राबवून दिनांक ०१/०२/२०२० पर्यंत भरण्याचे आदेश दिनांक २१/१२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

बिरसा क्रांती दल संघटनेचे जवाहर तहसिलदार कार्यालयामार्फत सादर केलेले निवेदन या विभागास प्राप्त झालेले नाही. तथापि, सदर संघटनेचे, तहसिलदार अंबरनाथ कार्यालयामार्फत मुख्यमंत्री कार्यालयास सादर केलेले दिनांक ०२/०३/२०२१ चे पत्र, या कार्यासनास प्राप्त झालेले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) विभागाच्या दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग केल्यामुळे रिक्त झालेली पदे दिनांक ३०/०६/२०२१ पर्यंत भरण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना सर्व विभागांना दिनांक १५/०४/२०२१ च्या अ.शा. पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बांदिवडे व भगवंतगड (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) ही दोन गावेगावे जोडणाऱ्या खारभूमी विकास बंधाऱ्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२६) ९५८१ (०९-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **खार जमिनी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांदिवडे व भगवंतगड (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) ही दोन गावे जोडणाऱ्या खारभूमी विकास बंधाऱ्याची अत्यंत दुरवस्था झाली असून, कालावल खाडी किनाऱ्यालगतच्या बांदिवडे, भगवंतगड, त्रिबंक गावातील शेतकऱ्यांची शेकडो एकर जमीन भरतीचे खारे पाणी मोठ्या प्रमाणात शेतीमध्ये घुसल्याने नापीक झाली असून ग्रामस्थांच्या सततच्या मागणीमुळे जलसंपदा विभागाकडून माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान बांदिवडे खार भूमी योजना या शिर्षकांखाली ८८ लाख ७९ हजार रूपये अंदाजित खर्चाची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन स्थानिक लोकप्रतिनिधीच्या हस्ते भूमीपूजन होऊन आजमितीस खारभूमी विकास बंधाऱ्याचे दुरूस्ती काम हातीच घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू खारभूमी विकास बंधाऱ्याच्या दुरूस्तीच्या कामास विलंब होत असल्यामुळे तेथील ग्रामस्थांनी सातत्याने पाठपुरावा करूनही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष व दिरंगाई होत असल्याने आंदोलन व बेमुदत उपोषणाचा मार्गही ग्रामस्थांनी अवलंबिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदरहू बंधाऱ्याच्या दुरूस्तीचे स्थगित असलेले काम विनाविलंब हाती घेवून पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१९-०७-२०२१) :** (१) नाही.

कालावल खाडी किनाऱ्यालगतच्या बांदिवडे, भगवंतगड, त्रिंबक गावातील शेतीचे नुकसान झालेले नाही.

बांदिवडे खारभूमी योजनेच्या उघाडीचे नुतनीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रकास मान्यता दिली असून या कामाकरीता रुपये ९०.०० लक्ष इतकी तरतूद केली आहे.

(२) अंशतः खरे आहे.

या योजनेचे कार्यारंभ आदेश दिनांक १९ जानेवारी २०१९ मध्ये देण्यात आले असून कंत्राटदारास काम सुरु करणेबाबत वारंवार सूचना दिल्यानंतर सदर योजनेचे काम माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये चालू करुन दोन्ही बाजूला रिंगबंड टाकण्यात आले होते. परंतु मार्च, २०२० पासून कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे झालेल्या टाळेबंदी व जिल्हाबंदीमुळे मजुर व यंत्रसामुग्री उपलब्ध न झाल्याने सदर काम करणे शक्य झाले नाही.

(३) होय.

सरपंच, बांदिवडे बु. यांनी दिनांक ०१/०३/२०२१ पासून उपोषण करण्याचे विभागास कळविले होते. त्या अनुषंगाने कार्यक्षेत्रावर बैठक घेऊन कंत्राटदारास काम सुरु करणेबाबत सुचना देण्यात आल्या. त्यानंतर ग्रामस्थांनी उपोषण स्थगित केले.

(४) काम चालू करण्याबाबत कंत्राटदारास वारंवार कळविले आहे. तथापी कंत्राटदाराने काम सुरु करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई प्रस्तावित केली आहे. दंडात्मक कारवाईअंती देखील कंत्राटदाराने काम सुरु न केल्यास सदर निविदा रद्द करून, या कामाची नव्याने निविदा बोलावून काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये काम सुरु झाल्यावर कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे झालेल्या टाळेबंदी व जिल्हाबंदीमुळे काम बंद पडले. त्यानंतर कंत्राटदाराला वारंवार सूचना देऊनही त्याने काम सुरु न केल्याने तसेच कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे काम करणेसाठी मजुर उपलब्ध झाले नाहीत.

---

## कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) येथे नवीन पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(२७) ९५९१ (२०-०७-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) परिसरात औद्योगिक कारखान्यांमुळे येथील लोकसंख्या वाढत असून जुनी पाणीपुरवठा योजना अपुरी पडत असल्याने जनतेच्या मागणीच्या अनुषंगाने व वाढत्या लोकसंख्येनुसार शासनाने रुपये ५ कोटींच्या नवीन पाणीपुरवठा योजनेस दिनांक १८ जानेवारी, २०१४ रोजी मंजूरी दिल्यानंतर तत्कालीन मा.ग्रामविकास मंत्री यांच्या हस्ते भूमिपुजन करुन सदरहू कामास सुरूवात करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करारानुसार सदरहू पाणीपुरवठा योजनेचे काम २४ महिन्यांच्या मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक होते मात्र मुदत संपूनही आजमितीस ७ वर्षांहून अधिक कालावधी होवूनही सदरहू योजनेचे काम अपूर्णावस्थेत बंद असून सदर काम अपूर्ण राहण्याची करणे काय,

(३) असल्यास, सदरहू पाणीपुरवठा योजनेचे काम अनेक वर्षपासून पूर्ण झाले नसल्याने सदरहू प्रलंबित असलेले काम शीघ्रगतीने पूर्ण करून योजना तात्काळ कार्यान्वित करावी याकरीता येथील ग्रामस्थांनी सातत्याने संबंधितांकडे पाठपुरावा करूनही कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवीन कुडूस पाणीपुरवठा योजनेचे प्रलंबित असलेले काम शीघ्रगतीने पूर्ण करुन योजना तात्काळ कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१५-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर योजनेचे काम अपूर्ण राहण्यास जलशुध्दीकरण केंद्राच्या जागेच्या अडचणीमुळे विलंब झाला आहे.

(३) सदर पाणीपुरवठा योजनेकरीता संबंधित ठेकेदार व ग्रामपंचायत यांच्यासोबत बैठक घेवून सदर काम पूर्ण करणेकरीता ठेकेदारास व ग्रामपंचायतीस वेळोवेळी मार्गदर्शन व सुचना केलेल्या आहेत.

(४) सदर योजनेचे उर्वरित कामाबाबत कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, पालघर कार्यालयाकडून दिनांक २०/०८/२०२१ च्या पत्रान्वये ठेकेदारास नोटीस बजावण्यात आली असून संबंधित ठेकेदाराने दिनांक २६/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर योजना दिनांक ३० ऑक्टोबर, २०२१ पर्यंत पूर्ण करून पाणीपुरवठा सुरु करण्यात येईल असे लेखी कळवले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासी विकास महामंडळाकडून शेतकऱ्यांच्या भात विक्रीचे पैसे मिळण्याबाबत

**(२८) ९६२० (१६-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आदिवासी विकास महामंडळाने वाडा तालुक्यातील मौ.खानिवली, गोऱ्हे, पोशेरी, परळी, खैरे-आंबिवली, गुहीर, कळंभे, मानिवली व गारगांव या गावांतील भात खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांकडून भाताची यंदा विक्री केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना आदिवासी विकास महामंडळाकडून सुमारे १६ कोटी २८ लाख १३ हजार ४२२ रुपये इतकी रक्कम देय असून गेल्या दोन महिन्यापासून त्यांना रक्कम मिळाली नसल्यामुळे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शेतकऱ्यांना सेवा सहकारी सोसायटयांचे कर्ज फेडण्यास अडचण निर्माण झाली असल्याचे दिनांक १९ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित शेतकऱ्यांना आदिवासी विकास महामंडळाकडून त्यांची भात विक्रीची रक्कम मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२५-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रात प्रादेशिक कार्यालय, जव्हार अंतर्गत उप प्रादेशिक कार्यालय, मोखाडा अंतर्गत एकूण ४४९ शेतकऱ्यांकडून वजन १४,६८३.८० क्विंटल धानाचे रक्कम रुपये २.६९ कोटी इतकी रक्कम धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यात आली आहे. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दापोडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील जेई मॅकेनिकल कंपनीत नायट्रोजन सिलेंडरचा स्फोट होऊन दुर्घटना झाल्याबाबत

**(२९) ९७४९ (१७-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील जेई मॅकेनिकल कंपनीत नायट्रोजन सिलेंडरचा भीषण स्फोट होऊन या स्फोटाच्या दुर्घटनेमध्ये २ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ४ कामगार गंभीर जखमी झाले असल्याचे दिनांक ९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही उपाययोजना व काळजी घेतली नसल्याने दुर्घटना घडली असून याप्रकरणी दोषींवर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व कामगारांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करुन दुर्घटनेतील जखमींना व मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२३-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

जेई मॅकेनिकल दापोडा, ता.भिवंडी, जि.ठाणे या कारखान्यात दिनांक ०९/१२/२०२० रोजी क्रायोजेनिक लिक्वीड नायट्रोजन सिलेंडरचा स्फोट होऊन ३ कामगारांचा मृत्यू व २ कामगार जखमी झाले होते.

(२) सदर प्रकरणी लोकप्रतिनिंधीनी दोषींवर कारवाई करण्याची व मृत कुटुंबांच्या वारसास नुकसान भरपाई देण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे निवेदन प्राप्त झाले असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ३१/१२/२०२० च्या पत्रान्वये योग्य ती कारवाई करण्याबाबत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयास अवगत केले आहे.

(३) सदर घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली असून नायट्रोजन सिलेंडर हाताळताना झालेल्या सुरक्षिततेच्या त्रृटींबाबत व अपघाताची माहिती संचालनालयास विहित वेळेत दिली नसल्याने कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांच्या न्यायालयात खटला दाखल करण्यात आला असून पोलीस विभागाने सदर घटनेबाबत कारखान्याचे भोगवटादार व इतर यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

तसेच सदर घटनेस गॅस सिलेंडर नियम, २०१६ च्या तरतुदी लागू होत असल्याने सह नियंत्रक, पेट्रोलियम आणि एक्सप्लोजिव्ह सेफ्टी ऑर्गनायझेशन (PESO) यांचे मार्फत चौकशी सुरु आहे.

अपघातातील २ जखमी कामगारांना वैद्यकीय उपचारानंतर घरी सोडण्यात आले असून अपघातातील ३ मृत कामगार ईएसआयसी (ESIC) अंतर्गत नोंदणीकृत असल्याने त्यांच्या वारसास ईएसआयसी मार्फत दरमहा पेन्शन मिळणार आहे. कारखान्याच्या भोगवटादाराने ३ मृत कामगारांच्या

वारसास प्रत्येकी रुपये ६.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्याचे मान्य केले असून एका मृत कामगाराच्या वारसास रुपये ६.०० लक्ष इतकी रक्कम देण्यात आली असून उर्वरीत दोन मृत कामगारांच्या कुटुंबियांनी सानुग्रह अनुदानाची रक्कम अद्याप स्वीकारलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर, मुरबाड व कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील वन हक्क दावे प्रलंबित असल्याबाबत

**(३०) ९७५० (०९-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील ११६९ वैयक्तिक वन हक्क दावे व २३३ सामूहिक वन हक्क दावे, मुरबाड तालुक्यातील ६४ दावे, कल्याण तालुक्यातील ११ वैयक्तिक दावे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित दावे निकाली काढण्याबाबत पाठपुरावा करुनही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने श्रमिक मुक्ती संघटनेने बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहापूर, मुरबाड व कल्याण तालुक्यातील वन हक्क दावे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०४-०८-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

(२) श्रमिक मुक्ती संघटना, मुरबाड यांनी दिनांक १८/१२/२०२० रोजी सर्वाधिक दावे प्रलंबित असलेल्या उपविभागीय अधिकारी, भिवंडी कार्यालयासमोर बेमुदत धरणे धरणार असल्याचे ई-मेल संदेशान्वये कळविले होते. त्याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी भिवंडी उपविभाग, भिवंडी यांनी शहापुर तालुक्यातील प्रलंबित ११६९ दावे दिनांक १५/०१/२०२१ पर्यंत जिल्हास्तरीय

समितीकडे सादर करण्यात येतील असे कळवून आंदोलन मागे घेण्याबाबत विनंती केली होती, त्याअनुषंगाने दिनांक १८ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास कोणतेही धरणे आंदोलन झाले नाही.

(३) सदरचे प्रलंबित दावे कालबध्द पध्दतीने निकाली काढणेबाबत जिल्हा स्तरीय समितीकडून उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, भिवंडी यांना निर्देश देण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करणेत आली आहे.

उपविभागीय स्तरीय समिती, भिवंडी यांच्याकडून शहापूर तालुक्यातील एकूण ११६९ दावे, कल्याण उपविभागातील मुरबाड तालुक्यातील ६४ दावे, कल्याण तालुक्यातील ११ वैयक्तिक दावे जानेवारी २०२१ मध्ये जिल्हा स्तरीय समितीकडे प्राप्त झाले आहेत.

सदर दाव्यांतील कागदपत्रांची पडताळणीचे कामकाज सुरू असून, वनहक्क कायद्यातील तरतुदी व उपलब्ध पुरावे तसेच अभिलेखानुसार सदर दाव्यात माहे जुलै, २०२१ अखेर पर्यंत निर्णय घेऊन, निकाली काढणेबाबतची कार्यवाही जिल्हास्तरीय समितीकडून करणेत येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: नागपूर शहरात वर्षभरापूर्वी कचरा वर्गीकरणाची सक्ती करुनही शहरात अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(३१) ९७६२ (१८-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नागपूर शहरात वर्षभरापूर्वी कचरा वर्गीकरण करण्याबाबत सक्ती करुनही त्याची शहरात अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कचरा वर्गीकरण करण्याची जबाबदारी ए.जी.एन्व्हायरो आणि बीव्हीजी या कंपन्यांना सोपविण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कचऱ्याचे संकलन न करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०७-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात एकूण २२,०८१ टन प्रति दिन इतका कचरा निर्माण होत असून त्यापैकी २१,०९७ टन प्रति दिन (९६ टक्के) इतका कचऱ्याचे संकलन करून १९,५०० टन प्रति दिन (८८ टक्के) इतका कचऱ्याचे वर्गीकरण व वाहतूक करण्यात येते.

नागपूर शहरात घरोघरी जावून कचरा संकलन व वाहतूक करण्याकरीता दोन कंपनीची नियुक्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे. महानगरपालिकेमार्फत सदर कंपनीसोबत करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कचरा नागरीकांकडून वर्गीकृत करूनच घेतला जातो, परंतू काही परिसरात नागरीकांव्दारे वर्गीकृत कचरा देण्यात येत नसल्यामुळे पूर्णत: कचरा वर्गीकृत करणे शक्य होत नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

कचरा विलगीकृत करून देण्याची जबाबदारी कचरा निर्मात्याची म्हणजेच नागरीकांची असून, विलगीकृत केलेला कचरा गोळा करून वाहतूक करण्याची जबाबदारी कंपन्यांना सोपविण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) याबाबत महानगरपालिका स्तरावर नियमीत आढावा घेण्यात येतो, तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास संबंधित कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्यात येते, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आर्वी (जि.वर्धा) या पुनर्वसित गावाकरीता सुरळीत पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत

**(३२) ९८१३ (१५-०७-२०२१) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) या पुनर्वसित गावाकरीता सन २०१७ मध्ये ३५ कोटी निधीपैकी ८९ लक्ष ७३ हजार रुपये पाणीपुरवठ्याकरीता मंजूर करून ३ वर्षे होवूनही अद्याप सदर गावाला पाणीपुरवठा सुरळीत सुरु नसल्याचे दिनांक १७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पुनर्वसित गावाला सुरळीत पाणीपुरवठा होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२५-०८-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. सदर योजनेच्या स्त्रोताची जागा अयशस्वी ठरल्यामुळे नविन जागा ठरविणे आवश्यक होते. नविन जागेचा स्त्रोत निश्चती करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(२) मंजूर योजनेतील उर्ध्वनलिका, उंच टाकी, वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण करून जुन्या स्त्रोतातून पाणीपुरवठा सुरु आहे. नवीन उद्भवाची जागा निश्चित करून विहिरीचे बांधकाम पूर्ण करून योजना पूर्ण करण्यात येणार आहे.
(३) सदर प्रकरणी विलंब झालेला नाही.

---

## कोकण, पश्चिम विदर्भ, नाशिक व पुणे विभागात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु ठेवण्याबाबत

**(३३) ९८२० (२०-०७-२०२१) श्री.विनायकराव मेटे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात टँकरने पाणीपुरवठा करण्याची संख्या घटली असली तरी कोकण, पश्चिम विदर्भ, नाशिक व पुणे विभागात टँकरद्वारे अद्यापही पाणीपुरवठा केला जात असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही गावे आणि वाड्यांमधील नागरिकांना नववर्ष आरंभापासून पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागत असून सदरहू पाच जिल्ह्यात सुमारे २१६ गावे, ५६६ वाड्यांना प्रतिदिन सुमारे ११३ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू चारही विभागात पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाण्याच्या कमतरतेमुळे नागरिकांचे हाल होत असल्याने सदरहू चारही विभागात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवण्याबाबत तसेच कोकणातील पाणीटंचाईवर उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०३-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, खरे आहे.

तथापि, दिनांक २८/०६/२०२१ अखेर रायगड व पालघर जिल्ह्यात प्रत्येकी १ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला.
(३) प्रत्यक्ष उद्भवणाऱ्या टंचाईच्या अनुषंगाने व टंचाई कृती आराखड्यानुसार टंचाई अंतर्गत आवश्यक उपाययोजना राबविण्यात येतात.
(४) टंचाई कालावधीत नंतर, जिल्हाधिकारी यांनी संबंधित जिल्ह्यात टंचाई कालावधी वाढविल्यास टंचाई निवारणार्थ टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे आवश्यक असल्यास त्याद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. व त्यानुसार चारही विभागातील काही जिल्ह्यात सद्य:स्थितीतसुध्दा टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

तसेच टंचाई कालावधीत तात्पुरती पुरक नळपाणीपुरवठा, नवीन विंधन विहिरी, विंधन विहीरी दुरुस्ती, साधी विहीर खोलीकरण करणे, प्रगतीपथावरील नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण करणे इत्यादी कामे पूर्ण करून पाणीपुरवठा सुरु करण्यात आला.

त्याचप्रमाणे कोकणातील ठाणे व पालघर जिल्ह्याची पाणी टंचाई कायमची दुर करणेकरीता जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

## अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या नावे झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणी संबंधितांवर कारवाई होणेबाबत

**(३४) ९८३९ (२२-०६-२०२१) श्री.सुरेश धस : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ५४८९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती अंतर्गत धारणी, पुसद, औरंगाबाद, किनवट व कळमनुरी या पाच प्रकल्पांत कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या नावे १ कोटी ९५ लाखांचा अपहार झाल्याचे चौकशी समितीच्या निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपहार करणारी संस्था एकच असून तीन वेगळे अध्यक्ष, सचिव असल्याची धक्कादायक बाब चौकशी समितीच्या निदर्शनास आले आहे तसेच संस्थेची देयके काढताना अधिकारी व कर्मचारी यांचे एकमेकांशी संगनमत असल्याचे स्पष्ट होवुनही त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१२ ते सन २०१६ या दरम्यान सदरील संस्थेने राष्ट्रीयकृत बँकेतून व्यवहाराला फाटा देऊन आदिवासी युवक युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण कागदोपत्री राबवुन खोटे प्रशिक्षणार्थी, ६१३ प्रशिक्षणार्थींची बनावट यादी, प्रशिक्षण स्थळ खोटे दाखविल्याचे चौकशी समितीसमोर स्पष्ट होऊनही कौशल्य विकास आयुक्तांनी काहीही कार्यवाही केली नसल्याने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन कठोर कार्यवाही करण्यासाठी शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने दिनांक २२ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारातील पत्रान्वये अंतरिम चौकशी अहवालाचे अनुषंगाने संबंधित संस्थेवर तसेच दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी अशा सूचना

अगोदरच प्रकल्प अधिकाऱ्यांना पत्राद्वारे दिलेल्या असून फौजदारी कारवाई करणेबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचेस्तरावर सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे, सदर सुनावणीस अनुसरुन कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०१-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) अपहार करणारी संस्था एकच नसून ३ वेगवेगळया संस्था आहेत. यासंदर्भात अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या दिनांक २०/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली असून या समितीने दिलेल्या अंतरिम चौकशी अहवालात संस्थेनी वित्तीय अनियमितता करुन शासनाची फसवणुक केली असल्याचे नमूद केले आहे. यासंदर्भात प्रकल्प कार्यालय, किनवट, धारणी, औरंगाबाद यांच्याकडून फौजदारी कारवाई करण्यात आली असून प्रकल्प कार्यालय, पुसद कार्यालयामार्फत फौजदारी कारवाई करण्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनला कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आंतरराष्ट्रीय चित्रप्रदर्शनात पाठविलेल्या पारधी जमातीतील चित्रकर्तींच्या आठ लाखांच्या कलाकृती आदिवासी विकास विभागाकडून गहाळ झाल्याबाबत

**(३५) ९८६१ (२२-०६-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मलेशियातील क्वालालंपूर येथे दिनांक ९ ते १७ जून, २०१८ या कालावधीत आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रप्रदर्शनामध्ये आदिवासी विकास विभागाने पाठविलेल्या पारधी या अनुसूचित जमातीच्या कलाकार श्रीमती स्वप्ना पवार यांच्या पारधी जमातीच्या कला व संस्कृतीवर आधारित ७ लाख ९० हजार रुपये किंमतीच्या २५ व्यावसायिक कलाकृती प्रदर्शनात सादर केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चित्रकला प्रदर्शनात विकलेल्या कलाकृतीचा मोबदला संबंधित महिला कलाकारास देऊन उर्वरित कलाकृती प्रदर्शनानंतर चांगल्या स्थितीत संबंधित कलाकारास परत करणे अपेक्षित असंताना आदिवासी विकास विभागाने त्याची दाखल न घेतल्यामुळे या कलाकृती गहाळ झाल्या असल्याचे तसेच सदर चित्रकर्तीस अद्यापपर्यंत कोणताही मोबदला देण्यात न आल्याचे दिनांक १८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत ३ वर्षांपासून सातत्याने आदिवासी विभागाकडे विचारणा करुनही उक्त प्रकरणाची विभागाने त्याची दखल घेतली नाही, विभागाच्या बेजबादारपणामुळे चित्रकर्तीना आर्थिक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, मलेशियातून या कलाकृती सुस्थितीत परत आल्या होत्या काय व आल्या, त्या कशा गहाळ झाल्या तसेच कलाकाराचा मोबदला अद्यापही मिळाला नसल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२४-०८-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

मलेशिया येथील आंतरराष्ट्रीय कला प्रदर्शनामध्ये पाठविलेल्या कलाकृतीपैकी काही कलाकृती परत प्राप्त झाल्या नाहीत. त्याची एकूण किंमत अद्याप निश्चित झालेली नाही.

(२), (३), (४) व (५) प्रस्तुत प्राप्त न झालेल्या कलाकृतीसंदर्भात संबंधित कलाकारांसोबत दिनांक २०/११/२०१८ रोजी प्रधान सचिव आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय मुंबई येथे बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीतील निर्णयानुसार प्राप्त न झालेल्या कलाकृतीच्या नुकसान भरपाई अदा करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना दिनांक २९/०१/२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी त्यांच्या स्तरावर संबंधित कलाकार व शासकीय अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. तथापि, सदर बैठकीस संबंधित कलाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित न राहिल्याने प्राप्त न झालेल्या कलाकृतीची संख्या व त्यांची नेमकी किंमत याची स्पष्टता झाली नाही.

मलेशिया येथे सदर साहित्य ने-आण करणाऱ्या संस्थेस काळ्या यादीत टाकण्यासाठी हस्तकलाशिल्प परिषद, नवी दिल्ली यांना कळविण्यात आले आहे. तसेच सदर संस्थेस प्राप्त न झालेल्या कलाकृतीची नुकसान भरपाई देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत दिनांक १८ जून, २०२१, च्या पत्रान्वये आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना कलाकृती प्राप्त न झालेल्या कलाकारांशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांना प्राप्त न झालेल्या कलाकृतींची संख्या व त्याची नेमकी किंमत याची माहिती घेऊन त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्याकडून कार्यवाही सुरु आहे.

---

## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्याच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित शासनसेवेत समायोजित करण्याबाबत

**(३६) ९८७६ (१८-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ७८४९ ला दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना कालावधीमध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्याच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी योगदान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कंत्राटी कर्मचाऱ्यांची विशेष बाब म्हणून सेवा प्रवेश नियमात तात्पुरता बदल करुन या कर्मचाऱ्यांना नियमित शासनसेवेत समायोजित करण्याच्या मागणीची पडताळणी पूर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सदर बाबीवर निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (३०-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०८ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये त्रिसदस्यीय मंत्री समिती गठीत करण्यात आली आहे.
(३) त्रिसदस्यीय मंत्री समितीच्या शिफारशीनुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी समकक्ष पदनिहाय संबंधित पदांच्या सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्याची विधीग्राह्यता तपासण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) मधील अनेक मोडकळील आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(३७) ९८८२ (१५-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील जुन्या इमारतींचा काही भाग कोसळण्याच्या घटना घडल्या असूनही मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मोडकळीस आलेल्या अनेक जुन्या व धोकादायक इमारतींची यादी अदयाप तयार करण्यात आली नसून नव्या सीआरझेड नकाशामध्येही सदर जुन्या

इमारतींचा समावेश करण्यात न आल्याने त्यांच्या पुनर्बांधणीचा प्रश्न ऐरणीवर आल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.आयुक्तांनी वारंवार संबंधित विभागाकडे पाठपुरावा करुनही अद्याप प्रभाग अधिकाऱ्यांकडून धोकादायक इमारतींची यादी जाहीर करण्यात आली नसल्याने रहिवाशी जीव मुठीत धरून रहात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन तात्काळ जुन्या व धोकादायक इमारतींची यादी तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३)

- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक स्थितीत असलेल्या इमारतींवर कारवाई करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ अन्वये संबंधित सहायक आयुक्त यांना पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे.
- प्रथमदर्शनी धोकादायक वाटणाऱ्या इमारतींची पाहणी करणे, संरचनात्मक तपासणी व टेस्टींग करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६५अ अन्वये बांधकाम अभियंत्याचे पॅनल तयार करण्यात आलेले आहे.
- सदर अभियंत्यांमार्फत इमारत राहण्यास योग्य आहे किंवा कसे हे तपासून अथवा इमारत धोकादायक असल्यास पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडून संबंधित इमारत धोकादायक घोषित करण्यात येते.
- सद्य:स्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १५९९ इमारतींना संरचनात्मक तपासणीकरीता नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

- २२ इमारती धोकादायक घोषित करण्यात आलेल्या असून यापैकी ०४ इमारती निष्कासित करण्यात आल्या आहेत. ०५ इमारती निष्कासित करण्याची कारवाई सुरू आहे. ०६ इमारतींना मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त असून ०३ इमारती रिक्त करण्यात आलेल्या आहेत.
- उर्वरित ०४ धोकादायक इमारतीमधील रहिवाशांना स्थलांतरीत करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शिवभोजन थाळी योजनेंतर्गत मोफत जेवणाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३८) ९८८४ (२०-०७-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुरु असलेल्या कोरोनाची साखळी मोडणे या प्रक्रियेअंतर्गत राज्यातील विविध समाज घटकांसाठी घोषित करण्यात आलेल्या मदतीच्या पॅकेजमध्ये माहे १४ जून पर्यंत शिवभोजन थाळी योजनेंतर्गत मोफत जेवणाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात माहे १५ एप्रिल ते २० मे पर्यंत किती गोरगरीब जनतेला शिवभोजन थाळीचा लाभ देण्यात आला आहे,

(३) असल्यास, यासाठी किती मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०९-०८-२०२१) :** (१) होय.

(२) दिनांक १५/०४/२०२१ ते २०/०५/२०२१ पर्यंत ४९ लक्ष ८४ हजार ५७९ एवढ्या शिवभोजन थाळींचे वितरण करण्यात आले आहे.

(३) दिनांक २३/०४/२०२१ पर्यंत राज्यात ८९१ शिवभोजन केंद्र कार्यान्वित होती. त्यानंतर वेगवेगळ्या आदेशान्वये दिनांक २०/०७/२०२१ पर्यंत ४२९ नवीन शिवभोजन केंद्रांना मंजूरी देण्यात आली आहे तर १८ कार्यरत शिवभोजन केंद्रांना थाळीवाढ देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत राज्यात ११०७ शिवभोजन केंद्र कार्यान्वित आहेत.

---

## राज्याच्या शिक्षण विभागाने १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेसंदर्भात निर्णय घेण्याबाबत

**(३९) ९८८८ (१५-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळासह इतर केंद्रीय, आंतरराष्ट्रीय मंडळे, राज्य मंडळ यांनी १० वीची परीक्षा रद्द केल्यानंतर १२ वीची परीक्षा रद्द करण्याबाबत पालकांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने राज्याच्या शिक्षण विभागाने १२ वीच्या परिक्षेसाठी पर्याय शोधायला हवा अशी भूमिका दिनांक २३ मे, २०२१ रोजी केंद्रीय स्तरावर झालेल्या बैठकीत मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी मांडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षेआधी सर्व विद्यार्थ्यांचे लसीकरण व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे तसेच १२ वीच्या विद्यार्थ्यांचे मुल्यमापन सुत्र केंद्रीय पातळीवर समान असावे, विद्यार्थ्यांचे मुल्यमापन मंडळाच्या परिक्षेव्यतिरिक्त इतर मार्गाने करणे शक्य असून कोरोना स्थिती नियंत्रणात आल्यानंतर परीक्षा घ्याव्यात असे मत उक्त बैठकीत शिक्षण तज्ञांनी व्यक्त केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन १२ वीच्या परिक्षांबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे, तसेच, याबाबत केंद्र शासनाने राज्य शासनाला काय निर्णय कळविला आहे व त्यानुषंगाने पुढील कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१६-०९-२०२१) :** (१) व (२) होय.

(३) दिनांक ११ जून, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणारी वर्ष २०२१ ची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा रद्द करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

# राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर प्रवर्गासाठीच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांच्या मागण्या पूर्ण होण्याबाबत

**(४०) ९९१३ (१४-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ७३१६ ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर प्रवर्गासाठीच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांचे ६० टक्के अनुदान तात्काळ अदा करणे, आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीला मान्यता अधिकार देणे, थकित वेतन व वेतनेतर अनुदानाचे अधिकार पूर्वीप्रमाणे जिल्हास्तरीय अधिकाऱ्याकडे देणे, ८ टक्के व १२ टक्के अनुदान सहाव्या वेतन आयोगानुसार मिळावे, विज्ञान शाखेकरीता भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र शिक्षकांची पदे मंजूर करणे या मागण्याबाबतचे निवेदन मा.इतर मागास बहुजन कल्याण मंत्री महोदय यांना देण्यात आल्याची बाब माहे मे, २०२१ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनातील मागण्यांनुसार भटक्या विमुक्त जाती व इतर प्रवर्गातील जाती व इतर प्रवर्गातील आश्रमशाळांमधील समस्या तातडीने सोडविण्याबाबत मा.मंत्री (इमाबक) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली असून त्यानुसार आश्रमशाळांमधील समस्या तातडीने सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर प्रवर्गासाठीच्या

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२८-०६-२०२१) :** (१) मे,२०२१ मध्ये अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) व (३) मा.मंत्री (इ.मा.ब.क.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी आयोजित बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर केल्याबाबत

**(४१) ९९७१ (१८-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेमध्ये कोरोना साथीच्या काळात रुग्णांना उपचार देण्यासाठी रुग्णालयात आवश्यक व्हेंटिलेटर, बेड्स आदीची खरेदी करण्यासाठी स्थायी समितीने महानगरपालिका आयुक्तांना गत वर्षी काही अधिकार बहाल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका आयुक्तांनी रुग्णालयात अत्यावश्यक नसलेल्या साधनांची परस्पर खरेदी केल्याची बाब माहे मे, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मध्यवर्ती खरेदी यंत्रणेमार्फत अत्यावश्यक नसलेल्या साधनांचा खरेदी प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरीसाठी न आणता परस्पर खरेदी करुन सदर प्रस्तावाची थोडक्यात माहिती देऊन मंजुरीसाठी आणले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्थायी समितीने दिलेल्या अधिकाराचा गैरवापर करणाऱ्या दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-०८-२०२१)** : (१) हे खरे आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईतील पाच घाऊक बाजारपेठेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४२) ९९८८ (१७-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील पाच घाऊक बाजारपेठेत कार्यरत असलेले सुमारे १५ ते १६ हजार दैनंदिन व्यापारी वा इतर घटकांच्या सेवेसाठी बाजार समितीची एकही रुग्णवाहिका नसल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाच बाजारपेठेतील हजारो व्यापारी व कामगारांचे तात्काळ रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्यामुळे गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नवी मुंबईतील अत्यावश्यक सेवा म्हणून सुरु असलेल्या पाच घाऊक बाजारपेठमध्ये व्यापाऱ्यांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२६-०८-२०२१) :** (१) व (२) हे अंशत खरे आहे,
मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, मुंबई ही मुख्यत्वे शेतमालाचे घाऊक खरेदी विक्रीचे बाजार केंद्र आहे. अत्यावश्यक वेळेस गरज भासल्यास नवी मुंबई महानगरपालिका आणि खाजगी रूग्णालयांकडून रूग्णवाहिका उपलब्ध होतात.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भाईंदर (पूर्व) येथील 'ओस्तवाल ओर्नेट' या इमारतीच्या विकासकाने गैरव्यवहार केल्याबाबत

**(४३) १०००२ (१८-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भाईंदर (पूर्व) येथील जेसल पार्क परिसरात अतिक्रमण करून उभारण्यात आलेल्या 'ओस्तवाल ओर्नेट' या सात मजली इमारतीच्या मूळ बांधकाम नकाशात बदल करून विकासकाने ४०० सदनिका व गाळ्यांची विक्री करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक ३० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासकीय अधिकाऱ्यांच्या खोट्या शिक्क्यांचाही वापर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नागरिकांची फसवणूक करणाऱ्या विकासक व त्याला सहकार्य करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०७-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) भाईंदर (पुर्व) येथील ओस्तवाल ऑर्नेट इमारत क्र. १ व २ मध्ये मंजुरीपेक्षा जास्त क्षेत्रावर बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित विकासक यांचे विरूध्द नवघर पोलीस ठाणे येथे एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६

चे कलम ५२, ५३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच तेथील अनधिकृत बांधकामावर दिनांक २२/११/२०१९, दिनांक ०९/०२/२०२१ व दिनांक २७/०४/२०२१ रोजी महानगरपालिकेमार्फत तोडक कारवाई करण्यात आलेली आहे.

ओस्तवाल ऑर्नेट इमारतीच्या विकासका विरूध्द मूळ नकाशात बदल करून फ्लॅट व गाळे विक्री केल्याप्रकरणी नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. I ३८०/२०२१, भा. द.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८ व ४७१ अन्वये दिनांक २०/०५/२०२१ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी नवघर पोलीस ठाणे यांचेमार्फत पुढील कारवाई सुरू असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई, बोरिवली येथे ब्रिटानिया कंपनीच्या गोडाऊनमध्ये अनधिकृत शेड उभारण्यात आल्याबाबत

**(४४) १००२३ (१७-०६-२०२१) श्री.रमेश कराड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, बोरिवली (पश्चिम) येथील भूषण प्लाझ बिल्डिंगच्या तळमजल्यावर असलेल्या ब्रिटानिया कंपनीच्या गोडाऊनमध्ये गाळेमालक श्री.मोहन भंडारी यांनी सोसायटी व महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृत शेड उभारल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत शेड उभारल्यामुळे सोसायटीतील नागरिकांना त्याचा त्रास होत असल्याने उपरोक्त प्रकरणी सोसायटीने महानगरपालिकेकडे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार नोंदवूनही अद्‌याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू अनधिकृत शेड निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०८-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सदर ठिकाणी बृहन्मुंबई कर्मचाऱ्यांनी दिनांक ०६/०३/२०२० रोजी केलेल्या स्थळनिरीक्षणादरम्यान सदर इमारतीच्या तळमजल्यावर लोखंडी पत्र्याचे शेड आढळून आल्यानंतर त्यावर योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन सदर लोखंडी शेडचे निष्कासन महानगरपालिकेमार्फत करण्यात आले होते.

दिनांक १८/०६/२०२१ रोजी पुन:श्च स्थळपाहणी दरम्यान सदर ठिकाणी पत्र्याचे शेड आढळून आले नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये पूरक पोषण आहार योजनेंतर्गत बालकांना निकृष्ट दर्जाच्या डाळींचे वाटप करण्यात आल्याबाबत

**(४५) १००६६ (१७-०६-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये पूरक पोषण आहार योजनेंतर्गत बालकांना निकृष्ट दर्जाच्या डाळींचे वाटप करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाटप करण्यात आलेल्या मुग डाळीच्या पाकिटावर पुरवठादाराचे नाव, एक्स्पायरी डेट, मॅन्युफॅक्चरिंग डेट व बॅच नंबर आदि कोणतीही माहिती नमुद नसल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील ३ हजार ५१० अंगणवाड्यांमध्ये ३ ते ६ वयोगटातील १ लाख २५ हजार ७७५ बालकांना कंत्राटदारांकडून पुरक पोषण आहार पुरवठा केला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी पुरवठादाराने अंगणवाड्यांना दिलेली मुगाची डाळ निकृष्ट असल्याच्या तक्रारी ग्रामीण भागातील महिलांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी आढळून आलेल्या पुरवठादारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे)(११-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

काही ठिकाणी जास्त प्रमाणात तुकडे असलेली डाळ वितरीत करण्यात आल्याची बाब निदर्शनास आल्यावर डाळ बदलून देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

मुग डाळीच्या पाकिटावर छोटया काळया पट्टीमध्ये मॅन्युफॅक्चरिग डेट व बॅच नंबर, वजन, आहाराचा प्रकार छापण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

पुरक पोषण आहार योजनेंतर्गत पोषण आहार वितरणाचे काम महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्यादित यांचेमार्फत करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) करारनाम्यातील तरतूदीनुसार तूकडे असलेली डाळ बदलून घेण्यात आली आहे. तसेच विविध प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी नमूने पाठविण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## विदर्भातील १०९ गावात पन्नास वर्षांपासून रस्ते नसल्याबाबत

**(४६) ११०६६ (२०-०४-२०१७) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ प्रदेश हा दिनांक १ मे, १९६० पासून महाराष्ट्र राज्याला जोडला गेला असून मागील ५५ वर्षापासून विदर्भातील आदिवासी दुर्गम भागातील १०९ गावांमध्ये अद्यापही रस्त्याचे बांधकाम करण्यात आले नसून ही गावे मुख्य रस्त्यांना जोडण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच या गावांमध्ये अद्यापही वीजही पोहोचली नाही, या गावातील रहिवाशांना रॉकेल मिळत नाही, धान्य दळणासाठी चक्कीची सोय नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही १०९ गावे कोणत्या जिल्ह्यातील आहेत,

(४) तसेच या गावांच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ (१२-०८-२०२१) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

(३) बहुसंख्य गावे ही गडचिरोली व अमरावती जिल्ह्यातील आहेत व प्रत्येकी १ गाव यवतमाळ व बुलढाणा जिल्ह्यातील आहे.

(४) शासन व जिल्हास्तरावर विविध योजनेतून निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही शक्य आहे.

---

## तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यातील ग्रामपंचायत नहरटोला येथील संगणक गहाळ झाल्याबाबत

**(४७) ३५९१८ (०२-०१-२०१८) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यातील ग्रामपंचायत नहरटोला येथील संगणक मागील सहा वर्षापासून गहाळ झाले असून स्थानिक लोकांना ऑनलाईनची व इतर संगणकाची कामे करण्याकरीता खाजगी इंटरनेट कॅफेवाल्याकडे जावे लागत आहे. संगणक गहाळ होण्यामागे ग्रामसेवक यांचा हलगर्जीपणा दिसून येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२१-०६-२०२१) :** (१) नाही.
(२) नाही. ग्रामपंचायत नहरटोला कार्यालयातून संगणक व प्रिंटर गहाळ झालेला नसल्यामुळे वा त्या बाबत तक्रार प्राप्त झालेली नसल्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये नोंदणीसाठी केलेले अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(४८) ३७१८३ (०२-०१-२०१८) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुतांश ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी हे एकमेकांच्या संगनमताने स्थानिक नागरिकांनी नोंदणीसाठी केलेल्या अर्जाच्या नोंदी मर्यादित कालावधीत नोंदवणे आवश्यक असतानाही त्यास १ वर्षाहून अधिक कालावधीचा विलंब लावत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागरीकांच्या नोंदणी पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२१-०६-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर येथील संतश्रेष्ठ गोरोबाकाकांचा व चैतन्यगृहाच्या बांधकामाच्या प्रस्तावाबाबत

**(४९) ४३८७० (२८-०८-२०१३) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हजारो वर्षांची ऐतिहासकि परंपरा असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर येथील संतश्रेष्ठ गोरोबाकाकांचा वाडा व चैत्यगृहाच्या बांधकामाच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाची एकूण किंमत किती आहे व सदरील कामाची आजची स्थिती काय आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) उस्मानाबाद जिल्ह्यातील संतश्रेष्ठ गोरोबाकाका मंदिर, तेर या तीर्थक्षेत्रास ब वर्ग दर्जा देण्यात आला आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासननिर्णय क्र. तिर्थवि-२०२१२/प्र.क्र.६५१/यो-७, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ अन्वये 'ब' व 'क' वर्ग तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी वाडा व चैत्यगृहाचे बांधकाम हाती घेता येत नाही. त्यामुळे जिल्हा परिषद, बांधकाम विभागामार्फत त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला नाही.

---

## मौजे काळधोंडा-मुळेखंड फाटा रोड (ता.उरण, जि.रायगड) येथील संपादित केलेल्या जमिनीवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(५०) ४६८३७ (०५-०७-२०१९) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काळधोंडा-मुळेखंड फाटा रोड (ता.उरण, जि.रायगड) येथील सर्व्हे नं. २४/१ या शासनाने संपादन केलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम केलेल्या प्रकरणाबाबत उरण येथील मा.न्यायालयात सन २००२ मध्ये दाखल केलेल्या

प्रकरणाचा शासनाच्या अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे शासनाविरुध्द निकाल लागला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकरणात दिरंगाई करणाऱ्या जबाबदार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रस्तूत प्रकरणी क्रिमिनल ॲप्लिकेशन क्र.४५२/२०१० च्या अनुषंगाने RCC १४८/२००२ मधील दिनांक १४/०२/२००८ रोजीच्या आदेशाविरुध्द अपील दाखल करण्यासाठी झालेल्या ५९४ दिवसाचा विलंबाच्या कारणास्तव मा.न्यायालयाने अपील अर्ज नाकारला आहे. तदनंतर अर्जदाराने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले Criminal (RLMP No.९२३६/२०११) मा.न्यायालयाने दिनांक १०/०५/२०११ रोजी फेटाळले आहे.
(२) संबंधित अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विरोधात सिडकोमार्फत कारवाईची नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच जानेवारी २००७ ते डिसेंबर-२०१० दरम्यान नियंत्रक, अनाधिकृत बांधकामे विभागात कार्यरत असणाऱ्या ०६ अधिकाऱ्यांना लेखी नोटीस देऊन सिडकोमार्फत खुलासा मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.